संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्र. ८८३/२०१४
महाराष्ट्र सरकार –वि– सुभाष
निशाणी क्र. १८

सरकार तर्फे साक्षीदार क्र. ०४
मी याद्वारे शपथपुर्वक निवेदन करतो की,
माझे नावः दौलत
वडीलांचे नावः रंगनाथ
आडनावः वाघमारे
माझे वयः ५६ वर्ष, व्यवसायः टेलर काम,
राहणारः देऊळगाव ताड, ता. भोकरदन, जि. जालना.

**सरतपासणी सरकारी वकिल श्री. ए. एन. गवळी यांच्याद्वारे**

०१. मी इयत्ता पाचवीपर्यंत शिकलेलो आहे. ज्ञानेश्वर रंगनाथ वाघमारे हा माझा भाऊ आहे. सदरचा अपघात हा दिनांक ०४.०८.२०१४ रोजी सकाळी ०९.३० ते ०९.४५ वाजताच्या सुमारास बाणेगाव फाटा ता. भोकरदन येथे झाला होता. त्यावेळी मी घरी होतो. मला ज्ञानेश्वरच्या मित्रांनी फोन करुन अपघाताबाबत माहिती दिली.

०२. माझा भाऊ ज्ञानेश्वर हा बाणेगाव फाटा येथून भोकरदनच्या दिशेने चालला होता त्यावेळी राजुर कडून भोकरदन कडे जाणारी एक गाडी आली व त्या गाडीने माझ्या भावाला ठोकर दिली. सदरची ठोकर देणारी गाडी ही टेम्पो होती. त्याचा क्र. एम.एच. २८ बी. ९९६३ असा होता. घटना मला मधुकर वाघमारे यांनी कळवली होती. त्यानंतर मी ज्ञानेश्वर यास दाखल केलेल्या जालना येथील दवाखान्यात गेलो. आम्हाला पोलीस फिर्याद नोंदविण्यास येतील असे कळविण्यात आले होते परंतु पोलीस फिर्याद नोंदविण्यासाठी आले नाहीत. त्यानंतर ज्ञानेश्वरची शारीरिक परीस्थीती तक्रार देण्यायोग्य नसल्याने मी स्वतः दिनांक २४.०८.२०१४ रोजी तक्रार दाखल केली.

०३. साक्षीदारास दिनांक २४.०८.२०१४ रोजीची फिर्याद दाखविण्यात आली. त्यामध्ये नमुद मजकुर बरोबर असल्याचे व त्याखाली सही केल्याचे साक्षीदाराने सांगितले. सबब सदरच्या फिर्यादीस **निशाणी क्र. १९** देण्यात येते. पोलीसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळी येऊन पंचनामा केला. अपघात हा सुभाष त्र्यंबक जाधव यांच्या चुकीमुळे झाल्या असल्याचे

मला समजले. सदरची बाब मी पोलीसांना सांगितली होती.

सरतपास पुर्ण

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. जी. एस. ठोंबरे यांच्याकडून</u>**

०४. मी घटना घडत असतांना प्रत्यक्ष पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी घडलेली घटना ही इतर लोकांच्या सांगण्यानुसार कथीत करत आहे. ज्ञानेश्वर हा दिनांक २४.०८.२०१४ रोजीपर्यंत दवाखान्यात होता. मी दवाखान्यामध्ये ये–जा करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, दवाखान्यातून आमच्या गावी पोहोचण्यापुर्वी राजुर येथील पोलीस ठाणे लागते. मी पोलीसांना फिर्याद देतांना ते दवाखान्यात येऊन फिर्याद नोंदवतील असे मला वाटत होते ही बाब मी पोलीसांना सांगितली होती. मी फिर्याद वाचुन पाहिली होती. साक्षीदारास फिर्याद वाचुन दाखविण्यात आली. त्यामध्ये सदरची बाब नमुद नसल्याचे साक्षीदाराने सांगितले. मला सदरची बाब नमुद नसल्याचे कारण सांगता येणार नाही.

०५. साक्षीदार मधुकर व प्रभाकर हे माझे चुलत भाऊ आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २४.०८.२०१४ रोजीपर्यंत मला घटनास्थळाबाबत माहिती नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मला दवाखान्यामध्ये माहिती मिळाल्यानंतर तथाकथीत घटनास्थळाबाबत माहिती झाली. हे म्हणणे खरे नाही की, भोकरदन ते जालना हा रस्ता सन २०१४ मध्ये खराब होता. मला तथाकथीत वाहनाचा क्रमांक मधुकर वाघमारे यांनी तथाकथीत घटनेदिवशीच सांगितला होता. आरोपीचे नाव मला तथाकथीत घटनेच्या ५ ते ६ दिवसानंतर समजले होते. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासामध्ये तथाकथीत घटनेविषयी, अपघाताविषयी व आरोपीविषयी नमुद केलेला मजकुर खोटा आहे.

०६. मला ज्ञानेश्वरने अन्य कोणते प्रकरण दाखल केले आहे अगर कसे याबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद खोटी आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद विलंबाने दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत/–

दिनांकः १२.०९.२०२५ (मयुरेश आर. काळे)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, भोकरदन